पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक- २०/०९/२०२०

## शहीद जवानांची स्मृती जागविणाऱ्या "शौर्य स्थळाचे" मा. पोलीस अधीक्षकांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी अभियान राबवितांना आजपर्यंत २१२ जवानांनी आपले बलिदान दिले असुन, या जवानांचे शौर्य व पराक्रम, देशासाठी त्यांनी केलेला त्याग कायम स्मरणात राहावा तसेच त्यांच्या आठवणी गडचिरोली पोलीस दलातील जवानांसाठी नक्षलविरोधी अभियानाकरीता सदैव प्रेरणा देत राहाव्या यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या संकल्पनेतून **"शौर्य स्थळ"** या वास्तुची उभारणी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक, कार्यालयाच्या आवारात करण्यात आली आहे. आज मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद कुटूंबियांच्या हस्ते या शौर्य स्थळाचे उद्घाटन पार पडले. यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. मोहितकुमार गर्ग सो., मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री. अजयकुमार बन्सल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मनिष कलवानिया, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. मुमक्का सुदर्शन सो. यांच्यासहीत इतर पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच शहीद जवानांचे कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी बोलतांना मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी गडचिरोली पोलीस दलातील शहीद पोलीस जवानांच्या शौर्याचे स्मरण करत, या जवानांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेले शौर्य स्थळ गडचिरोली जिल्ह्यातील जवानांना नक्षलविरोधी लढ्यासाठी नक्कीच प्रेरणा देत राहील असा विश्वास व्यक्त केला. तसेच जिल्ह्यातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना गडचिरोली पोलीस दलाच्या जवानांची शौर्य गाथा 'शौर्यस्थळाच्या' माध्यमातुन समजुन घेता येईल. याकरीता जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी या शौर्य स्थळाला आवर्जुन भेट द्यावी. असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी जिल्हाभरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना केले आहे.

गडचिरोली पोलीस दलाने उभारलेल्या शौर्य स्थळ या वास्तुमध्ये नक्षलविरोधी लढ्यात शहीद झालेल्या जवानांच्या शौर्याचे व अप्रतिम कामगिरीचे लेखन करण्यात आलेले असुन, या शहीद जवानांच्या शौर्याच्या गाथा सांगणाऱ्या चित्रफितीही तयार करण्यात आलेल्या आहेत. याचबरोबर ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी राष्ट्रपती पदक, राष्ट्रपती शौर्य पदक इ. प्राप्त झाले आहेत, त्यांच्या नावांचा उल्लेखही शौर्य स्थळामध्ये करण्यात आला आहे. गडचिरोली पोलीस दलाने जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसहीत प्रत्येक घटकासाठी राबविलेल्या नाविण्यपुर्ण योजनांनाही शौर्यस्थळांमध्ये स्थान देण्यात आले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या हस्ते 'पोलीस हॉस्पीटलचे नुतनिकरण व बहुउद्देशिय चिकित्सा केंद्राचा' उद्घाटन सोहळा पार पडला. रुग्णालयामध्ये पेशंटकरीता सर्व सोयी-सुविधा एकाच ठिकाणी प्राप्त व्हाव्यात व गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी राबवित असणाऱ्या जवानांना तात्काळ उपचार मिळावेत. मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या संकल्पनेतुन या रुग्णालयाची उभारणी करण्यात आली आहे. या रुग्णालयात अत्याधुनिक मशिनरीसह तज्ञ डॉक्टरांची टिम सदैव सेवेत राहणार असल्यामुळे या रुग्णालयाचा फायदा जिल्हाभरातील पोलीस अधिकारी व त्यांचे कुटूंबियांना होणार आहे.




शौर्य स्थल









